# विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, अमरावती

## आयएसओ ९००१ : २००८ मानांकित कार्यालय (पुरवठा)

बायपास रोड, कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२

दुरध्वनी क्र. ०७२१-२६६२६६६ फॅक्स क्र. ०७२१- २६६६१०१

ई- मेल- dycomms.amt@gmail.com

क्र.आकाअ/पुरवठा -४ /कावि- 2915-85 /२०१४

दिनांक : २८.०७.२०१४

**आदेश**

विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती यांचे अधिनस्त पुरवठा निरीक्षक (संवर्ग) पदावर रु. ५२००-२०२०० ग्रेड वेतन २८००/- या वेतनश्रेणीत खालील नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून खालील उमेदवारांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येत आहे. सोबत विहीत केलेल्या अटी पूर्ण करणा-या उमेदवारांच्या सेवा "पुरवठा निरीक्षक संवर्गातील पदे (सेवाप्रवेश) नियम १९८८" च्या तरतुदीनुसार नियमीत करण्यात येतील.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | नियुक्तीचे पदनाम | नियुक्तीचा जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | ओंकार दादाजी पडोळे | अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, मारेगाव | यवतमाळ |
| २ | शिवाजी चंद्रभान घुगे | अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, लोणार | बुलडाणा |
| ३. | रविंद्र चंद्रकांत येन्नावार | पुरवठा निरीक्षक, तहसील कार्यालय, उमरखेड | यवतमाळ |
| ४. | अमोल बापूराव पळसपगार | पुरवठा निरीक्षक, तहसील कार्यालय, अकोला | अकोला |
| ५. | रुपेश विजय बिजेवार | पुरवठा निरीक्षक, तहसील कार्यालय, शेगाव | बुलडाणा |
| ६. | जितेंद्र सुरेश पाटील | अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, मुर्तीजापूर | अकोला |
| ७. | देवेंद्र गणेश वाणी | अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, मलकापूर | बुलडाणा |
| ८. | राखी अन्नाजी पाटील | अव्वल कारकून, तहसिल कार्यालय मोर्शी | अमरावती |
| ९. | शैलेश सुभाषराव देशमुख | अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, धारणी | अमरावती |
| १०. | सागर अंबादास माकोडे | गोदाम व्यवस्थापक श्रेणी २, शासकीय धान्य गोदाम, पातूर | अकोला |
| ११. | रखमाजी पंढरीनाथ नागरे | गोदाम व्यवस्थापक श्रेणी २, शासकीय धान्य गोदाम, खामगाव | बुलडाणा |
| १२. | स्मिता शिवाजीराव दळवी | अव्वल कारकून, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, अमरावती | अमरावती |
| १३. | नरेश व्यंकटेशराव शिल्पकार | अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, महागाव | यवतमाळ |
| १४. | चांदणी शेषराव शिवरकर | पुरवठा निरीक्षक, तहसील कार्यालय, यवतमाळ | यवतमाळ |
| १५. | शिरीष आनंदराव कापडे | गोदाम व्यवस्थापक श्रेणी २, शासकीय धान्य गोदाम, आर्णी | यवतमाळ |
| १६. | सपना मनोहर भोवते | पुरवठा निरीक्षक, अन्न धान्य वितरण अधिकारी कार्यालय, अमरावती | अमरावती |
| १७. | विशाल वासुदेवराव भगत | अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, मानोरा | वाशिम |
| १८. | भुपेंद्र नरेंद्र सोनकुसळे | गोदाम व्यवस्थापक श्रेणी २, शासकीय धान्य गोदाम,घाटंजी | यवतमाळ |

| | | | |
|---|---|---|---|
| १९. | मनीषा रमेशराव माजरखेडे | पुरवठा निरीक्षक तहसील कार्यालय, तिवसा | अमरावती |
| २०. | स्मिता जीवनराव बहिरमवार | पुरवठा निरीक्षक, तहसील कार्यालय, कळंब | यवतमाळ |
| २१. | अर्चना सदाशिव भगत | अव्वल कारकून, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, अकोला | अकोला |
| २२. | राजश्री शंकरराव दाभाडे | अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, अकोट | अकोला |
| २३. | भारती ईश्वरराव सोनटक्के | अव्वल कारकून, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, यवतमाळ | यवतमाळ |
| २४. | निलेश विठ्ठलराव राठोड | अव्वल कारकून, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, बुलडाणा | बुलडाणा |
| २५. | स्मिता मनोहर ढोके | पुरवठा निरीक्षक, तहसील कार्यालय, कारंजा | वाशिम |
| २६. | व्यंकटेश नागनाथ रावलोड | गोदाम व्यवस्थापक श्रेणी २, शासकीय धान्य गोदाम, वाशिम | वाशिम |
| २७. | योगेश मुरलीधर जंगले | गोदाम व्यवस्थापक श्रेणी २, शासकीय धान्य गोदाम, मेहकर | बुलडाणा |
| २८. | रुपाली केशवराव सोळंके | पुरवठा निरीक्षक तहसील कार्यालय, चांदुरबाजार | अमरावती |

१. संबंधित जिल्हाधिका-यांनी त्यांचे जिल्हयामध्ये नियुक्ती देण्यात आलेल्या सरळ सेवा भरतीच्या उमेदवारांना त्वरीत पदस्थापना दयावी व या पदावरील नवीन नियुक्त उमेदवारांचे वेतन व भत्ते काढावेत. पदस्थापना दिलेल्या आदेशाची प्रत त्वरीत या कार्यालयास पाठवावी.

२. पुरवठा निरीक्षक संवर्गात नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांचा परिविक्षाधीन कालावधी हा दोन वर्षाचा राहील. दोन वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर तसेच अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने पुरवठा विषयक सेवाअंतर्गत परीक्षा देण्याची अट घातल्यास सदरची परीक्षा पास झाल्यानंतर विभागीय आयुक्त स्तरावरून कायम नियुक्तीचे आदेश काढण्यात येतील व त्यानंतर सदर कर्मचा-यांचे पुढील वेतनवाढी काढण्यात यावे.

३. वित्त विभाग, शा.नि.क्र अनियो १००५/१२६/सेवा-४, दि. ३१.१०.२००५ मधील तरतुदीनुसार दि. १.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर शासकीय सेवेत नियुक्ती मिळालेल्या उमेदवारांना परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना, भविष्य निर्वाह निधी योजना यांच्या तरतुदी लागू राहणार नाही.

४. संबंधित उमेदवारास हे आदेश प्राप्त होताच एक महिन्याचे आंत रुजू व्हावे लागेल अन्यथा आपणास नोकरीची गरज नाही असे गृहीत धरून प्रतिक्षाधिन उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल व त्यानंतर आपली तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

५. उमेदवार हे दोन वर्षाकरीता परिविक्षाधिन पुरवठा निरीक्षक म्हणून संबंधित जिल्हाधिका-यांचे नियंत्रणाखाली राहतील, संबंधित जिल्हाधिका-यांनी सदर्हु उमेदवारांना पुरवठा विषयक कामकाजासंबंधी असलेल्या संपूर्ण कामकाजाचे व हयासंबंधाने शासनाकडून तयार करण्यात आलेल्या नियमांचे / कायद्याचे सखोल प्रशिक्षण द्यावे.

६. संबंधित उमेदवारांना जिल्हाधिका-यांनी विहीत केलेला प्रशिक्षण कार्यक्रम व परिविक्षाधिन कालावधी समाधानकारक रित्या पूर्ण करावा लागेल. जे उमेदवार परिविक्षाधिन कालावधी समाधानकारक रित्या पुर्ण करणार नाहीत असे उमेदवार त्यांच्या नियुक्त्या रद्द होण्यास पात्र ठरतील.

७. सदर्हू उमेदवारांची नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपाची असून ही नियुक्ती त्यांना पुरवठा निरीक्षक संवर्गात सेवाज्येष्ठता, वेतननिश्चिती इत्यादी संबंधात कोणत्याही प्रकारचे अधिकार प्रदान करणार नाही. परिविक्षाधिन कालावधी समाधानकारक पुर्ण केल्यानंतर उमेदवारांची दिर्घ मुदतीच्या तत्वावर नियुक्ती करण्यात येईल.

८. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २०११/प्र.क्र. १०६४/२०११/१६-ब, दि. १२ डिसेंबर २०११ मधील तरतुदींनुसार सरळसेवा भरतीमध्ये ज्या उमेदवारांची निवड विशिष्ट मागास प्रवर्गासाठी आरक्षीत असलेल्या जागांवर झालेली आहे व ज्यांनी नियुक्तीपुर्वी शासनाकडे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही, अशा उमेदवारांनी त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर नियुक्ती देण्यात येईल.

९. सा.प्र.वि. शासन निर्णय क्र. प्रशिक्षण २०००/प्र.क्र. ६१२२००१ /३९, दि. १९ मार्च, २००३ मधील तरतुदीनुसार संगणक अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची सेवा समाप्त होण्यास पात्र राहील.

१०. पुरवठा निरीक्षक संवर्गाचे नियुक्ती नियम १९८८ अनुसार, सदर्हू उमेदवार पुरवठा निरीक्षक संवर्गातील पुरवठा निरीक्षक, गोदाम व्यवस्थापक (वर्ग -२), सहा. परिमंडळ अधिकारी, धान्य खरेदी निरीक्षक, वाहतूक निरीक्षक, पुरवठा अव्वल कारकून या पदापैकी कोणत्याही पदावर, विभागामध्ये कुठेही नियुक्तीस/ बदलीस पात्र राहील.

११. उमेदवारास शासन सेवेचा राजीनामा दयावयाचा असल्यास एक महिन्याची आगावू नोटीस अगर त्याऐवजी एक महिन्याचे वेतन शासन जमा करावे लागेल.

१२. उमेदवारांना प्रादेशिक भाषा व हिंदी भाषा परिक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण करावी लागेल.

१३. भारतीय संविधानानुसार निष्ठासंबंधी लेखी शपथपत्र दाखल करणे आवश्यक राहील.

१४. सदर निवडीसंदर्भात न्यायालयात वाद उपस्थित झाल्यास न्यायालयाचे आदेशानुसार निर्णय घेण्यात येईल. न्यायालयाचे आदेश अंतीम व उमेदवारास बंधनकारक राहील.

१५. नियुक्तीच्या ठिकाणी रुजु होतांना शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे, जन्म तारखेच्या पुराव्या संबंधि प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र व तत्सम शैक्षणीक पात्रतेची मुळ प्रमाणपत्रांच्या छायांकीत प्रती साक्षांकीत करून कार्यालय प्रमुखाकडे सादर करणे अनिवार्य राहील.

१६. सदर नियुक्ती संबंधित पोलीस आयुक्त / जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेकडून करण्यात येणा-या सचोटी व चारित्र्य पडताळणीवर अवलंबून राहील. सदरहू अहवाल असमाधानकारक असल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता आपली सेवा समाप्त करण्यात येईल.

१७. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र) नियम २००५ च्या अंमलबजावणी नुसार आपणास दिनांक २८ मार्च २००५ रोजी किंवा त्यानंतर हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक आढळून आल्यास नियुक्तीकरीता अपात्र ठरविण्यात येईल.

१८. उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र लागू असलेल्या जाती प्रवर्गांचे उमेदवारांना सदर प्रमाणपत्र सादर करणे प्रकरणपरत्वे अनिवार्य राहील.

१९. नियुक्तीचे ठिकाणी रुजू होण्याकरीता कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

२०. संबंधित कार्यालयाने उमेदवारांना देण्यात आलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजु करून घेते वेळी आवश्यक त्या अटी व शर्तीची तसेच आवश्यक प्रमाणपत्राची पुर्तता करून घेणे आवश्यक आहे. उमेदवार रुजू झाल्याबाबत लेखी अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा.

२१. उमेदवारांनी संमांतर आरक्षणाचा लाभ यापूर्वी घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती रद्दबातल करण्यात येईल.

२२. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८२ च्या तरतुदीनुसार संबंधित उमेदवारांकरडून शारीरीक पात्रतेसंबंधीचे सक्षम अधिका-यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यात यावी व त्यानंतरच त्यांना कार्यालयात रुजु करून घ्यावे. याबाबतची नोंद संबंधित कर्मचा-यांचे सेवापुस्तिकेमध्ये घेऊन आहरण व संवितरण अधिका-यांनी असे प्रमाणपत्र पहिल्या वेतनबिलासोबत पाठविणे अनिवार्य राहील.

२३. उमेदवारांनी रुजू होतांना मत्ता व दायीत्वाचे प्रमाणपत्र कार्यालयास सादर करावे.

**विभागीय आयुक्त, अमरावती.**

प्रतिलिपी -

१. मा. प्रधान सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय, मुंबई - ३२, यांना माहितीकरीता सादर.
२. जिल्हाधिकारी अमरावती /अकोला /यवतमाळ/वाशिम/बुलडाणा.
३. उपआयुक्त (महसूल), अमरावती विभाग अमरावती
४. श्री. सागर माकोडे यांची नियुक्ती महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर खंडपीठ येथे दाखल अर्ज क्र ४५७/२०१४ च्या निर्णयास अधिन राहून करण्यात येत आहे.
५. श्री/श्रीमती ------------------------------------------ ---------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------------पुरवठा निरीक्षक/अव्वल कारकून/ विभागीय गोदाम निरीक्षक श्रेणी २.
६. निवड नस्ती.

**विभागीय आयुक्त, अमरावती.**